२८

जा.क्र./राकृवियो/कृ.यां.अ/भाग-२/ब्रश कटर/२०१७-१८/गुनि-५//२०१८
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१
दिनांक : १९/०१/२०१८

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक ............... (सर्व)

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ............ (सर्व)

**विषय: "उन्नत शेती - समृध्द शेतकरी" योजनेंतर्गत कृषि यांत्रिकीकरण या घटकांतर्गत ब्रशकटर या यंत्राचा समावेश करण्याबाबत .....**

**संदर्भ:** १. वि.कृ.स.सं. ठाणे यांचे पत्र जा.क्र./कृयांउ/कृषि-३/७७९१, दि. ६/१२/२०१७

२. शासन पत्र क्रमांक. राकृवि-०३१७/प्र.क्र.१८/राकृवियो कक्ष, दिनांक. ०८/०१/२०१८

उपरोक्त विषयावरील विभागीय कृषि सहसंचालक, कोकण विभाग, ठाणे यांच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रकरणी शासनाने संदर्भिय पत्र दिनांक ०८/०१/२०१८ अन्वये ब्रश कटर या यंत्राचा /उपकरणाचा Basket of Implements मध्ये समावेश करण्यास मान्यता प्रदान केली आहे. सदरहू शासन पत्राची प्रत सोबत सहपत्रीत केली आहे. ब्रश कटर या यंत्रास प्रचलीत योजनांतर्गत अनुज्ञेय असलेल्या अनुदानाच्या मापदंडानुसार अनुदान अदा करण्याबाबत कळविले आहे.

त्यानुसार "उन्नत शेती - समृध्द शेतकरी" मोहिमेंतर्गत ब्रश कटरचा लाभ लाभार्थींना देण्यात यावा. इच्छुक शेतक-यांकडून ब्रश कटरकरीता अर्ज मागवून "उन्नत शेती - समृध्द शेतकरी" मोहिमेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**सोबत : शासन पत्र दि.८/१/२०१८ ची प्रत**

**(एम. एस. घोलप)**
**कृषि संचालक (नि. व गु. नि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत :

**कृषि संचालक (विस्तार प्रशिक्षण),** साखर संकुल, शिवाजीनगर, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०५ - यांना माहितीस्तव

63/15

# महाराष्ट्र शासन

क्र. राकृवि-०३१७/प्र.क्र.१८/राकृवियो कक्ष
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- ८ जानेवारी, २०१८

INWARD
Commissioner Agriculture Cell
No: 272 Date: 12/1/18
By:

प्रति,

संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण),
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

**विषय :- "उन्नत शेती - समृद्ध शेतकरी" योजनेंतर्गत कृषि यांत्रिकीकरण या घटकांतर्गत ब्रशकटर या यंत्राचा समावेश करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १) शासन पत्र समक्रमांक दि.२७ सप्टेंबर, २०१७ रोजीचे पत्र
२) कृषि संचालक (नि. व गु.नि.), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. राकृवियो/उशेसशे/भाग-२/२०१७-१८/गुनि-५/४६४/२०१७,दि. ०६.१२.२०१७

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपल्या दि.०६.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये "उन्नत शेती-समृध्दी शेतकरी" अभियांनांतर्गत Basket of Implements मध्ये ब्रश कटरचा समावेश करण्याची विनंती करण्यात आली होती.

त्यानुषंगाने, संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये मान्यताप्राप्त परिक्षण संस्थामार्फत परिक्षण केलेले विविध कंपन्यांचे ब्रश कटर बाजारात उपलब्ध असल्याबाबतची वस्तुस्थिती व सदर यंत्राची Basket of Implements मध्ये समावेश करण्याची आपली शिफारस लक्षात घेऊन ब्रश कटरचा Basket of Implements मध्ये समावेश करण्यास अनुमती देण्यात येत आहे, सदर यंत्रास प्रचलित योजनांतर्गत अनुज्ञेय असलेल्या अनुदानाच्या मापदंडानुसार अदा करण्यात यावे. त्याचप्रमाणे, इच्छुक शेतकऱ्यांकडून ब्रश कटरकरिता अर्ज मागवून योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार अनुदान मंजूरीची कार्यवाही करावी ही विनंती.

आपला विश्वासू,

(श्रीकांत आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Dir DEOC 11/1/18

प्रत-

आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

E:\RKVY\Letters\USS-Mechanisation-RKVY.doc